

# ईस्ट बे मराठी मंडळ
## दिवाळी धमाका २००५ वृत्तांत

प्लेझंटन ८ नोव्हेंबर २००५

**"ई.बी.एम.एम."** च्या परंपरेला साजेसा असा दार्जेदार **"दिवाळी धमाका** २००५" हा कार्यक्रम लायडीकसन एलीमेंटरी स्कूलच्या मल्टीपरपज रूममध्ये शनिवार ५ नोव्हेंबर रोजी दुपारी २ ते रात्री ८ ह्यावेळात सुमारे २५० लहान मोठयां सभासदांच्या उपस्थितीत साजरा झाला.

गणेशोत्सवाचा बहारदार कार्यक्रम ११ सप्टेंबर रोजी झाल्यानंतर तसे पाहीले तर फारच थोडा वेळ हातात होता. परंतु गणेशोत्सवाच्या नेत्रदिपक यशामुळे कार्यकारीणीच्या सदस्यांचा उत्साह दांडगा होता. पहिली बैठक गांधी जयंतीच्या मुहुर्तावर २ ऑक्टोबरला प्लेझंटनमधील रम्य क्रीकसाईड पार्क मध्ये झाली. नेहेमीप्रमाणे खाद्य, मनोरंजन, क्रीडा, सभासद, हिशोब, पूजा ईत्यादी वेगवेगळया समित्यांची स्थापना झाली आणि झपाटयाने कामाला सुरूवात झाली.

**नितिन गांधी** आणि **विलास ठुसे** ह्यांच्या कुशल व अनुभवी नेतृत्वाखाली आराखडा तयार झाला. **"ई.बी.एम.एम."**ने सुरू केलेल्या विविध छंद वर्गांना अल्पावधीतच मिळालेला प्रतिसाद बघून ह्या वर्षी प्रथमच **बुद्धिबळ, कॅरम, टेनिस** आणि **टेबल टेनिस** स्पर्धा आयोजित केल्या.

क्रीडाप्रेमी **मिलिंद वैद्य**नी स्पर्धांच्या संयोजनाची धुरा अतिशय समर्थपणे पेलली. **किरण नाईक, हेमंत कापडणे, पराग इंगळे, विलास ठुसें**नी कॅरम उपलब्ध करून दिले. **मिलींद**ने टेबल टेनिसच्या टेबलची व्यवस्था केली. विजेते आणि उपविजेते पदांचे मानकरी झाले खालील खेळाडूः

**<u>कॅरम</u>ः हेमंत कापडणे, मिलींद वैद्य**
**<u>टेनिस</u>ः प्रकाश भोज, प्राची नाईक**
**<u>टेबल टेनिस</u>ः पराग इंगळे, मिलींद वैद्य**

**<u>बुद्धिबळ ज्युनियर</u>ः अनिकेत पाटील, नचिकेत डाकवाले**
**<u>कॅरम ज्युनियर</u>ः निखिल पाटील, मिहिर नाईक**
**<u>टेनिस ज्युनियर</u>ः तनय जाईल, मिहिर नाईक**
**<u>टेबल टेनिस ज्युनियर</u>ः सौरभ डाकवाले, नचिकेत डाकवाले**

क्रीडा स्पर्धा धुमधडाक्यात झाल्याने सर्वांचे डोळे आता करमणुकीच्या कार्यक्रमाकडे लागले होते. अखेर उत्कंठा शिगेला नेणारा ५ नोव्हेंबरचा शनिवार उगवला आणि "शनिवार हा न कर्त्याचा वार असतो" हे पारंपारीक विधान मंडळाच्या कार्यकर्त्यांनी साफ खोटे करून दाखविले. चला तर बघुया काय होता दिवाळी धमाका २००५.

सुरूवतीला स्वागत कक्षातील **राहुल कुलकर्णी**, त्यांचे वडिल **श्री. विश्वनाथराव** तसेच **श्रीपाद चिंचणकर** व **शिरीष पाटील** ह्यांनी नोंदणी व्यवस्था केली. **अंजली करंदीकर**नी उपस्थित सभासदांचे सहर्ष स्वागत करून समारंभाला सुरूवात केली.

ह्यावर्षी प्रथमच लक्ष्मीपूजनाने प्रारंभ झाला. मंडळाचे पुरोहित **श्री. विलास ठुसे** उर्फ **पंडितजीं**च्या कुशल पौरोहित्याखाली मंडळाच्या सदस्या **डॉ.सीमा देशमुख** ह्यांचे वडिल **श्री व्यंकटेश** व आई **सौ. मंगला जोशी** ह्यांच्या हस्ते तसेच एल ॲंड टी इन्फोटेकचे **श्री अभिजित** व **सौ. अस्मिता परब**

ह्यांच्या हस्ते लक्ष्मीपूजन झाले. **अंजली गांधी**ने नेहेमीप्रमाणे पूजासामग्री पुरविली होती. लक्ष्मीदेवतेची आराधना झाल्यावर पुढील कार्यक्रम सुरू झाला.

दिवाळी म्हणजे दिव्यांचा सण. डोळयासमोर उभ्या राहतात दिव्यांच्या माळा. मंडळाच्या काही गृहिणींनी अतिशय नेत्रदिपक असे "**दीप नृत्य**" आणि "**गरबा नृत्य**" सादर केले. ह्या विलोभनीय नृत्यांचे दिग्दर्शन **डॉ.प्रीति चिटगोपेकर**नी केले होते. विषेश म्हणजे स्वतः प्रीति ह्या निष्णात दंतवैद्य आहेत आणि त्यांचा दातांचा दवाखाना त्यांच्या प्लेझंटनमधल्या राहत्या घरापासून सुमारे ६० मैल अंतरावर असलेल्या नापा ह्या शहरात आहे. आपल्या व्यवसायानिमित्त त्यांना रोज सुमारे ३ तासांचा प्रवास करावा लागतो. तरीही त्यांनी नियमित सराव करून घेतला आणि सर्व कलाकारांकडून सुंदर नृत्यांचा कार्यक्रम सादर करवून घेतला. इतकेच नाही तर बरेचदा लहान मुलांच्या नाचाचा सरावही त्यांच्याच घरी झाला.

सुरूवातीलाच प्रेक्षकांची वाहवा आणि "**वन्स मोअर**" मिळवून गेलेल्या ह्या नृत्यांत भाग घेतला होता **डॉ.प्रीति चिटगोपेकर**, **गौरी अभ्यंकर**, **दीपाली हर्षे**, **उत्तरा पितळे, शारदा कुलकर्णी**, **रूपा भोज**, **हर्षदा पाटगावकर** आणि **सायली वासनीक** यांनी! **अंजली भेद** यांनी सर्व नृत्य कलाकार आणि नऊवारी साडीतल्या नेहाची रंगभूषा अगदी व्यावसायिक दर्जाची केली होती त्यामुळे ह्या कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

लहान मुलांचे जग हे मन हरखून टाकणारं असतं. **अंजली करंदीकर**च्या अतिशय प्रभावी दिग्दर्शनाखाली पु. ल. देशपांडे लिखित सदु आणि दादू ह्या विनोदी कथेवर आधारित "**जादूचे पुस्तक**" ही बाल कलाकारांनी सादर केलेली नाटुकली सर्वांना खदखदून हसवून गेली. ह्यातील आमचे बाल कलाकार होते **आकाश करंदीकर** (दादू), **गौरी जोशी** (दादूची बायको मंदा), **सोनाली करंदीकर** (शोभा शहापूरकर टायपिस्ट), **नचिकेत डाकवाले** (दाजी कुडाळकर), **सौरभ डाकवाले** (कविराज शांता महाडकर), **तनय जाईल** (परशुरामपंत बर्वे) व **गौरव इनामदार** (सखाराम चपराशी).

मंडळीऽऽ अमेरिकेत जन्मलेल्या, वाढलेल्या आणि सफाईदार अमेरिकन इंग्रजी बोलणाऱ्या ह्या बालमंडळींनी अस्खलित मराठीत सादर केलली ही नाटुकली आणि त्यांचे रंगमंचावरचे अवधान वाखाणण्याजोगे होते आणि ही किमया घडवुन आणली होती **अंजली**ने!

ह्यानंतर **दीपाली हर्षे**च्या निपुण दिग्दर्शनाखाली तब्बल १८ लहान लहान मुलांकडून बसवून घेतलेले "**अगडम बगडम**" हे बहारदार बालनृत्य सर्व लहान मोठया प्रेक्षकांना वेडावून गेले. ह्यातील कठपुतळी झाल्या होत्या **नेहा कुलकर्णी**!

**केतकी अभ्यंकर**, **सानिका कुलकर्णी**, **अंकिता इनामदार**, **रिया चिंचणकर**, **रश्मी भोज**, **रिया पितळे**, **सलोनी वासनीक**, **दूर्वा कापडणे**, **प्रियांका वाळिंबे**, **सोनाली राजुरकर**, **शची देशमुख**, **वैदेही देशपांडे**, **कृतिका इंगळे, रिया जोशी**, **सोनिया अत्रे**, **नील माहुरे, शौनक राजुरकर** आणि **हृषिकेश इंगळे** ह्या बाल कलाकारांनी यात भाग घेतला होता.

एवढया लहान मुलांकडून विविध हावभावांचे नृत्य बसविणे हे एक कठिणच काम आहे पण ते **दीपाली**ने स्वतःची नोकरी आणि २ वर्षाचा मुलगा मिहिर ह्याला सांभाळत समर्थपणे करून दाखविले आणि दिपालीला मोलाचे सहकार्य केले **नेहा**ने! **नमिता जोशीं**नी त्यांच्या घरी काहीवेळा सरावाची छान सोय करून दिली होती. सर्व मुलांच्या पालकांनीही हा कार्यक्रम यशस्वी होण्यास खूप हातभार लावला.

बालगोपालांनी एकापाठोपाठ एक सादर केलेल्या ह्या दर्जेदार कार्यक्रमांनंतर पाळी होती मोठयांची. व.पु.काळे लिखित विनोदी संवादिनीवर बेतलेली व "कला" (कॅलिफोर्निया आर्टस् असोसिएशन) चे प्रख्यात दिग्दर्शक **श्री आनंद घाणेकर** ह्यांनी दिग्दर्शित केलेली **"आज तरी भांडशील ना?"** ही खुसखुशीत नाटिका सर्व प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद मिळवून गेली. ह्या नाटिकेत **शरद कुलकर्णी** (भांडणाऱ्या बायकोचा धसका घेतलेला देवधर), **मीरा जाईल** (देवधरची भांडकुदळ बायको संजीवनी), **शार्दुल जेवळीकर** (मिराशी), **प्रशांत करंदीकर** (बर्वे), **योगेन उपाध्ये** (दिवेकर), **अजित खेर** (टोणगावकर), **अंजली इनामदार** (मोहिनी मराठे) आणि **संजय आपटे** (देवधरचा मेव्हणा रमेश) ह्यांनी भाग घेतला होता.

ध्वनी योजना आणि प्रस्तावना **नितीन गांधी**, संगीत **विलास ठुसे** आणि पडद्यामागील सूत्रसंचालन **मयूर कुलकर्णी** अशी बहूमोलाची साथ ह्या प्रयोगाच्या यशात भागिदार होती. **नितीन** आणि **विलास** यांनी नाटिका निवडणे, कलाकारांची निवड करणे, तालमींना हजर राहून वेळोवेळी उपयुक्त सुधारणा सुचविणे असे मोलाचे योगदान दिले. नितीन, संजय, मीरा व अंजली ह्यांच्या घरी खेळीमेळीच्या आणि आपुलकीच्या वातावरणात नाटकाच्या तालमी झाल्या.

भरपेट मनोरंजनानंतर पोटपूजेची व्यवस्था मंडळाच्या खाद्य समितीने अगदी चोख केली होती. प्लेझंटनमधील एक व्यवसायिक **प्रीति पारिख** ह्यांच्या सौजन्याने अल्प दरात चविष्ठ अल्पोपहार उपस्थितांना उपलब्ध झाला तसेच प्लेझंटनमधीलच **सुगंध इंडियन क्यूझिन** तर्फे सर्वांना गरमा गरम चहा देण्यात आला. **अंजली व नितीन गांधी, डॉ.प्रीति व सुनिल चिटगोपेकर, वंदना व श्रीपाद चिंचणकर, शिल्पा खेर, पूजा जाईल, अश्विनी नाईक, नीता पाटील, मयूर कुलकर्णी, गौरी अभ्यंकर, नेहा व प्रकाश कुलकर्णी, वर्षा उपाध्ये, प्रसाद देशमुख, डॉ. वैशाली व रवि गुंडीमेडा** ह्या मंडळींच्या परिश्रमांमुळे खानपान व्यवस्था मनाजोगती झाली. इथे एक आवर्जून उल्लेख करायला हवा कि **डॉ. वैशाली गुंडीमेडा** (पूर्वाश्रमीच्या भागवत) ह्या त्यांच्या मोठया भगिनी **अंजली गांधीं**कडे स्वतःच्या बाळांतपणासाठी आल्या आहेत. त्यांनी व डालस येथे सिव्हील इंजिनियर असलेले त्यांचे पति **रवि** ह्यांनी या कार्यक्रमात खूप हिरिरीने भाग घेतला व मदत केली. हे वृत्तनिवेदन तयार होत असतांनाच आनंदाची बातमी समजली की गुंडीमेडा कुटुंबाला ७ नोव्हेंबर रोजी एक पुत्ररत्न प्राप्त झाले आहे. मंडळातर्फे त्यांचे मनःपूर्वक आभार आणि हर्दिक अभिनंदन!!

मध्यंतरानंतर कार्यक्रम पुन्हा सुरू झाला तो बच्चे कंपनीच्या **फॅन्सी ड्रेस शोने**. **अंजली इनामदारांनी** संचलित केलेल्या ह्या विलोभनीय कार्यक्रमात भाग घेतला होता **गौरव जोशी, रिया वैद्य, सानिया वैद्य, युवराज महाडेश्वर, तन्वी कर्डिले, निकिता बनकर, नील भिडे, नील जोशी, मृण्मयी देशपांडे, अभिनव कुलकर्णी, ईशान कुलकर्णी** आणि **कुणाल कर्डिले** ह्या बाल मंडळींनी.

ह्यानंतर हिंदी गाण्यांवर आधारित एका **अभिनव अंताक्षरीचा** कार्यक्रम झाला. हा नेहेमीच्या अंताक्षरीपेक्षा खूपच वेगळा होता. लकी ड्रॉ पद्धतीने निवडलेल्या एखाद्या वस्तूच्या नावावरून गाणे म्हणणे, सिनेमातील एखाद्या प्रसंगातील गाणे म्हणणे, गाण्याच्या काही ओळी ऐकून सिनेमा आणि गायक ओळखणे असे ह्या नाविन्यपूर्ण अंताक्षरीचे स्वरूप होते. ह्याचे संचालन केले होते **नेहा कुलकर्णीं**नी. ध्वनी संयोजन व तंत्र निर्देशन (कंप्यूटर व प्रोजेक्टर) **नितीन गांधी** व **प्रविण माहुरें**नी केले. ह्यात खालील टिम्सनी भाग घेतला होताः

**<u>रेड टिम</u> (विजेते)ः परागा इंगळे, हेमंत कापडणे, कांचन कापडणे**
**<u>ग्रीन टिम</u>ः प्रकाश भोज, मनीष कुलकर्णी, समीर गांधी**
**<u>पर्पल टिम</u>ः निवेदिता जोशी, अश्विनी नाईक, नीता पाटील**
**<u>ब्लू टिम</u>ः शरद कुलकर्णी, आरती बनकर, मधुरिका कुलकर्णी**
**<u>ऑरेंज टिम</u>ः मीरा जाईल, हर्षदा पाटगावकर, सुचिता राजुरकर**
**<u>यलो टिम</u>ः पूजा जाईल, अंजली करंदीकर, विवेक करंदीकर**

ह्या कार्यक्रमानंतर कॉन्कर्ड शहरातील **ओम स्पायसेस** आणि लिव्हरमोर शहरातील **लक्ष्मी ग्रोसर्स** यांच्या सौजन्याने लज्जतदार मॅंगो आईसक्रीमचा आस्वाद सर्वांना घेता आला. ह्याचे श्रेय **वर्षा उपाध्येच्या** शेवटच्या क्षणी केलेल्या प्रयत्नांना आहे. **श्री. सूर्या येर्रा** हे ओम स्पायसेस मध्ये **श्री अशोक रेड्डी** व लक्ष्मी ग्रोसर्स मध्ये **श्री वेंकट** ह्यांचे भागिदार आहेत. ह्या सर्वांच्या औदार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

ह्यानंतर **प्रशांत करंदीकर** यांच्या उत्स्फूर्त गाण्याने सर्व प्रेक्षकांना ठेका धरायला लावला. त्यांनी अगदी सहजपणे सर्वांना आपल्या गाण्यात सहभागी करून घेतले. प्रशांत **एल ॲंड टी इन्फोटेक** ह्या भारतातील **लार्सन ॲंड टुब्रो** उद्योग समुहातील अग्रगण्य सॉफ्टवेर कंपनीतर्फे प्रोजेक्टसाठी अमेरिकेत आपल्या सुमारे २५ते ३० सहकाऱ्यांबरोबर सद्या सॅन रमोन शहरात वास्तव्यास आहेत. ह्या रसिक मुंबईकरांनी योग्य वेळी योग्य दाद देउन कलाकारांना प्रोत्साहन दिले तसेच अधुनमधुन मार्मिक परंतू दर्जेदार कोपरखळया देउन मुंबई पुण्यातील नामांकीत कॉलेज गॅदरिंगची रंगत आणली. मदतीस सदैव तयार असलेली ही सर्व मंडळी अगदी थोड्याच काळात मंडळाचा एक घटकच बनली आहेत. त्यांच्या मते मुंबईत देखील असे दर्जेदार कार्यक्रम विरळाच बघायला मिळतात.

ह्याच ग्रुपच्या **अनिरूद्ध अग्निहोत्रीं**च्या विनोदाने सर्वांचे मनोरंजन केले. **अभिजीत परब, पराग सामंत, उमेश झेंमसे, प्रदिप कोटकर** व त्यांच्या सहकाऱ्यांनी मंडळाच्या कलाकारांना व समितीला खूप प्रोत्साहन दिले.

मनोरंजनाचे सर्व कार्यक्रम संपल्यावर सगळयांना सामिल करून घेणारा सदाबहार **तंबोल्याचा** खेळ झाला. त्याचे आयोजन **डॉ.प्रीति चिटगोपेकर** व **श्रीपाद चिंचणकर** यांनी केले.

हे सर्व कार्यक्रम सुरू असतांना **शिल्पा खेर**नी मुलांकडून **ग्रिटींग कार्डस्** तयार करून घेतली. त्यात भाग घेतला होता **गौरी जोशी**, **सानिका कुलकर्णी** आणि **तनय गांधी** ह्या मुलांनी.

ह्या वर्षी **रांगोळी प्रदर्शनात** सहभाग होता **कांचन कापडणे**, **नमिता जोशी**, **उत्तरा पितळे** व **सोनाली राजुरकर** यांचा.

विविध स्पर्धांमधील विजेत्यांना व उपविजेत्यांना तसेच वेगवेगळया कार्यक्रमात भाग घेतलेल्या बाल कलाकारांना प्रशस्ती पत्रके देण्यात आली.

सभागृहाच्या सजावटीचे व इतर व्यवस्थेचे काम **मिलींद वैद्य, नीता व शिरीष पाटील, प्रसाद देशमुख, प्रकाश भोज, मयूर कुलकर्णी** आदिंनी सफाईने पार पाडले. **नितीन गांधीं**नी पिण्याच्या पाण्याचा फिल्टर उपलब्ध करून दिला.

लायडीकसन शाळेचे कर्मचारी **श्री जोझे** आणि **डायाना लिगेट,** म्यूझिक टिचर **श्री ग्रेग डेव्हिस** तसेच प्लेझंटन युनिफाइड स्कूल डिस्ट्रीक्टच्या **श्रीमती गिब्सन** ह्यांनी खूप सहकार्य दिले आणि शाळेच्या विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या. मंडळ ह्या सर्वांचे अत्यंत आभारी आहे.

प्रत्येक चांगली गोष्ट केंव्हा ना केंव्हा तरी संपतेच तद्वतच **ईस्ट बे मराठी मंडळाच्या** ह्या आणखी एका यशोगाथेची सांगता झाली. मंडळातर्फे सर्वांना दिवाळीचा फराळ आणि शुभेच्छा म्हणून लाडू व चिवड्याचे पाकिट देण्यात आले.

अतिशय थोड्या अवधित आयोजित केलेल्या ह्या उत्कृष्ट समारंभाचे शिल्पकार आहेत **ई.बी.एम.एम. कार्यकारीणीचे कष्टाळू सदस्यः**

**अंजली व नितीन गांधी, डॉ.प्रीति व सुनिल चिटगोपेकर, वंदना व श्रीपाद चिंचणकर, अश्विनी व किरण नाईक, नीता व शिरीष पाटील, नेहा कुलकर्णी, वर्षा उपाध्ये, मिलींद वैद्य, प्रसाद देशमुख, अंजली करंदीकर, अंजली इनामदार, शिल्पा खेर, गौरी अभ्यंकर, शारदा व राहूल कुलकर्णी, शरद कुलकर्णी, शार्दूल जेवळीकर** आणि **विलास ठुसे.**

ह्या सर्व उत्साही मंडळींनी अथक मेहेनत करून दिवळी धमाका २००५ हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनापासून प्रयत्न केले कष्ट घेतले.

जाता जाता असे सांगावेसे वाटते कि सर्व कलाकार, मंडळाचे कार्यकर्ते व स्वयंसेवक ह्यांना त्यांच्या कुटुंबीयांकडून अतिशय मोलाची साथ मिळाली, ज्याच्याशिवाय हा समारंभ इतका दर्जेदार होउ शकला नसता. त्या सर्वांचे मंडळ अत्यंत ऋणी आहे.

रसिक प्रेक्षक लाभणे ही एक भाग्याची गोष्ट असते आणि सुदैवाने **"ई.बी.एम.एम."** ला ते भाग्य लाभले आहे. कार्यकारिणी समितीने केलेल्या ह्या एका अल्पशा प्रयत्नाला भरघोस पाठिंबा दिल्याबद्दल **"ई.बी.एम.एम."** च्या सर्व सभासदांचे मनःपूर्वक आभार.

वृत्तांत अंमळ लांबला हे जरी खरे असले तरी कार्याची व्याप्ती आणि त्यामागे असलेल्या अगणित परिश्रमांची सुयोग्य शब्दात दखल घेऊन भावी मराठी पिढीसाठी एका स्फूर्तिदायक इतिहासाची नोंद करावी हा एक हेतु त्यामागे आहे.

अशया ह्या संस्मरणीय कार्यक्रमाची **रवि गुंडीमेडा** व इतरांनी टिपलेली क्षणचित्रे पाहण्यासठी आमच्या वेबसाईटला अवश्य भेट द्या व आपला अभिप्राय जरूर कळवा.

धन्यवाद! भेटुया लवकरच.

## ई.बी.एम.एम. कार्यकारीणी समिती

**www.ebmm.org**

*(News report by – Vilas Thuse – vilas.thuse@ebmm.org)*